औरंगाबाद महानगरपालिकेतील निविदा प्रक्रियेत झालेल्या अनियमीततेबाबत चौकशी करण्याकरीता चौकशी समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः याचिका-२०१८/प्र.क्र.१८१/नवि-२४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १० मे, २०१८

<u>वाचा</u>

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे जनहित याचिका क्र. ३८/२०१७ मधील दिनांक २६ एप्रिल २०१८ चे आदेश.

शासन निर्णय:

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक सोई सुविधांच्या विकास कामासाठी राज्य शासनाकडून उपलब्ध करून दिलेल्या रू. २४.३३ कोटी निधीमधून औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रा मधील रस्त्यांच्या निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत श्री. विकास प्रकाश एडके यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ३८/२०१७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २६/४/२०१८ रोजी पुढील प्रमाणे आदेश दिले आहेत:-

"We direct the Chief secretary, Government of Maharashtra, Mumbai to appoint an officer not below the rank of the Secretary, and preferably the Secretary to the Urban Development Department, as an Enquiry officer. The Chief Secretary, Government of Maharashtra to take appropriate steps for the appointment of such Enquiry officer as expeditiously as possible, however, on or before 10th May, 2018. The said officer shall complete preliminary enquiry as expeditiously as possible, however, on or before 10th June, 2018, and submit report to this court."

२. मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशानुसार मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन यांनी या प्रकरणी चौकशी करण्यासाठी प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे.

३. मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ३८/२०१७ मध्ये दिनांक २६.४.२०१८ रोजी दिलेले आदेश व त्याअनुषंगाने मा. मुख्य सचिव यांनी या प्रकरणी चौकशी करण्यासाठी प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्याची केलेली शिफारस विचारात घेता या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासन पुढील प्रमाणे समिती गठित करण्यास मान्यता देत आहे:-

(१)	मा. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
(२)	श्री सुहास शिंदे, मुख्य लेखा परिक्षक, नवी मुंबई महानगरपालिका	सदस्य
(३)	उप सचिव (नवि-२४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य-सचिव

४. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सदर समितीने या प्रकरणी सखोल चौकशी करून त्याबाबतचा आपला चौकशी अहवाल मा. उच्च न्यायालयास दिनांक १० जून, २०१८ पर्यंत सादर करावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१०१७११२१६२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2a1564be91cbedd893aaab701c944da0950abced08fbfefaaa118c3884344a4f, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2018.05.14 15:00:47 +05'30'

(सुधाकर ज्ञा. बोबडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४) विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
५) जिल्हाधिकारी, औरंगाबाद
६) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद
७) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका
८) श्री सुहास शिंदे, मुख्य लेखा परिक्षक, नवी मुंबई महानगरपालिका
९) सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद.(पत्राव्दारे)
१०) निवड नस्ती (नवि-२४)